# सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३


**तात्काळ**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१२/ ९७६

दिनांक :- १०/०४/२०१२.

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका संस्था.

**विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेतील व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्तीची रक्कम विद्यार्थ्यांना अदा करण्यासाठी बँक खाते उघडण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १५/अर्थस/इबीसी/इसीएस/२०११-१२/२३६ दिनांक ३१ मार्च २०१२.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शासनामार्फत अदा करण्यात येणारी सर्व प्रदाने/रकमा हे इलेक्टॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीम (ECS) व्दारे अदा करण्यात यावीत असे वित्त विभागाने आदेशित केल्यानुसार आपल्या संस्थेतील आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्तीची रक्कम प्रदान करण्याचे दृष्टीने Core Banking ची सुविधा असलेल्या बँकेत आपल्या संस्थेचे स्वतंत्र खाते उघडण्यात यावे, जेणेकरुन शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता आर्थिकदृष्टया मागास लाभार्थी विद्यार्थ्यांना या कार्यालयाव्दार मंजुर झालेली रक्कम आपणास अदा करणे शक्य होईल. तसेच लेखा जतन करुन हिशोब ठेवण्यास सोईचे होईल.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, यासोबत जोडलेल्या जोडपत्र "अ" मध्ये माहीती भरुन या कार्यालयास **दिनांक १३/०४/२०१२** पर्यंत हस्तदेय सादर करावी. जेणेकरुन ई.सी.एस./एन.ई.एफ.टी. व्दारे आपल्या संस्थेस मंजुर करण्यात आलेली रक्कम अदा करणे शक्य होईल.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीस सादर.

२) प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

F:\training document computer.doc

## जोडपत्र - अ

## ई सी एस / एन ई एफ टी व्दारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशिल

१. फर्मचे नांव / संस्थेचे नांव

२. कार्यालयाचे नांव व पत्ता (ज्या प्रकरणी लागु आहे)

३. बँक खाते क्रमांक

४. बँक खात्याचा प्रकार

५. बँकेचे नांव

६. बँक शाखेचे नांव व पत्ता

७. बँक शाखेचा संकेतांक

८. एम आय सी आर क्रमांक

९. आय एफ एस सी संकेतांक

दिनांक मागणीदाराची सही

## बँकेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे.

शाखा प्रमुख
______________ (बँक शाखेचे नांव व शिक्का)